महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

ई-पीक पाहणी

व्हर्जन - 2

# महाराष्ट्र शासन
## महसुल व वनविभाग

## माझी शेती माझा सातबारा,मीच नोंदविणार माझा पीकपेरा

# ई-पिकपाहणी





**तहसिल कार्यालय अकोले**

**जिल्हा-अहमदनगर**

महाराष्ट्र शासन

ई-पीक पाहणी

# ई-पीकपाहणी आवश्यकता व गरज



- ❖अचुक व वस्तुनिष्ठ पिक पेरणीची माहिती
- ❖नैसर्गिक आपत्ती मदतीसाठी
- ❖पिकविमा योजना साठी पीकपेरा माहिती
- ❖कृषी विभागाच्या विविध योजना लाभासाठी
- ❖पीककर्ज साठी पीकपेरा माहिती
- ❖जमिनीच्या अचुक मुल्यांकन साठी पीकपेरा
- ❖वन्य प्राणी पीकनुकसान मदतीसाठी पिकपेरा

**आता पीकपाहणी शेतकरी स्वतः नोंदविणार.....आपल्या बांधावरूनच**

महाराष्ट्र शासन

ई-पीक पाहणी

# ई-पीकपाहणी मध्ये नोंद करता येणाऱ्या बाबी

- ❖निर्भेळ पीक/मिश्र पिक माहिती
- ❖फळबागा माहिती
- ❖पॉलिहाऊस पिक/शेडनेट पिक माहिती
- ❖पड जमिन माहिती (घरपड,गवतपड)
- ❖जलसिंचन साधन व प्रकार (विहीर,बोअरवेल,शेततळे)
- ❖बांधावरील झाडांची माहिती



महाराष्ट्र शासन

ई-पीक पाहणी

# ई-पीकपाहणी ऊस पिकाची नोंद

❖मा.साखर आयुक्त ,साखर आयुक्तालय पुणे यांचे परिपत्रक जा.क्र.साआ/विकास/४५९/२०२१ दिनांक २३ ऑगस्ट २०२१ नुसार

साखर कारखान्याकडे ऊस नोंदी केलेल्या सर्व शेतकरी यांना ई पिकपाहणी मध्ये ऊस नोंद करणे बंधनकारक..





महाराष्ट्र शासन

# शेतकरी नोंदणी प्रक्रिया व मार्गदर्शक सूचना

ई-पीक पाहणी

1) नोंदणी प्रक्रियेसाठी स्मार्ट मोबाईल (Android) द्वारे गुगल प्ले स्टोर / वेब लिंक वरून अॅप डाऊनलोड करून स्थापित (Install) करावा.
2) खातेदाराने अॅप मध्ये मोबाईल क्रमांकाची नोंद करावी.
3) ७/१२ मधील नावाप्रमाणे खातेदाराने त्यांच्या नावाची अचूकपणे नोंदणी करावी.
4) खातेदार त्यांच्या नाव किंवा खाते क्रमांक शोधून नोंदणी करू शकतील.
5) ज्या खातेदाराचे एकाच महसुली गावात एकापेक्षा अधिक खाते क्रमांक आहेत, त्यांनी त्यांचे नाव नमूद केल्यास, त्या गावातील त्यांचे सर्व खाते क्रमांक व त्या खालील सर्व भूमापन/ गट क्रमांक मोबाईल स्क्रीनवर नोंदणीसाठी दिसतील.
6) वरील प्रक्रिया पूर्ण झाल्या नंतर नोंदणीकृत मोबाईलवर एसएमएस(SMS) द्वारे चार अंकी संकेतांक (पासवर्ड) प्राप्त होईल.
7) सदरहु प्राप्त झालेला चार अंकी संकेतांक (पासवर्ड) चौकटीत अचूकपणे नोंदविल्यास खातेदाराची नोंदणी प्रक्रिया पूर्ण होइल.
8) यशस्वी नोंदणी प्रक्रीये नंतर नोंदणीकृत मोबाईलवर खातेदाराचे नाव निवडून चार अंकी संकेतांक (पासवर्ड) चौकटीत टाकून लॉगइन केल्यास पीक पाहणीची माहिती भरता येईल.

महाराष्ट्र शासन

# सर्व साधारण मार्गदर्शक सूचना

ई-पीक पाहणी

1) शेतकऱ्यांच्या नोंदणीकरिता त्यांचा खाते क्रमाक / भूमापन/ गट क्रमांकच्या माहितीसाठी संगणकीकृत ७/१२ किंवा ८ अ ची अद्यावत प्रत सोबत असल्यास योग्य राहील
2) सामायिक मालकीच्या जमिनीसाठी, ज्याचे नाव गां.न.नं. ७/१२ मध्ये सामायिक खातेदार म्हणून नोंदले आहे, ते स्वतंत्रपणे नोंदणी करू शकतील.
3) अल्पवयीन खातेदाराच्या बाबतीत त्याचे पालक (अज्ञान पालक कर्ता) नोंदणी करु शकतील.
4) मोबाईल इंटरनेट सुविधेत अडचण येत असल्यास गावातील ज्या परिसरात इंटरनेट कनेक्शन मिळेल त्या ठिकाणी जाऊन नोंदणी करता येईल.
5) नोंदणीकृत मोबाईलवर एस एम एस द्वारे आलेला चार अंकी संकेतांक (पासवर्ड) कायमस्वरूपी वैध राहून वापरता येईल.
6) एखाद्या शेतकऱ्याकडे स्वत :चा स्मार्टफोन नसेल, तर सहजरीत्या उपलब्ध होणारा दुसरा स्मार्टफोन नोंदणीसाठी वापरू शकतात .

महाराष्ट्र शासन

ई-पीक पाहणी

# गावात इंटरनेट सुविधा नसल्यास

- ❖गावात इंटरनेट सुविधा नसल्यास ज्या भागात इंटरनेट सुविधा आहे त्याठिकाणी जाऊन नोंदणी प्रकिया करावी.
- ❖मोबाईल मधिल लोकेशन फक्त चालु ठेवावे.
- ❖शेतमद्ये जावून पिकांची संपूर्ण माहिती भरावी.पिकांचा फोटो काढावा.माहिती साठवा म्हणावे.
- ❖त्यानंतर इंटरनेट क्षेत्रात आल्यावर अपलोड बटण वर जावून पीकपाहणी माहिती अपलोड करावी




महाराष्ट्र शासन

# गुगल प्ले स्टोअरवरील ई-पीक पाहणी ॲप

ई-पीक पाहणी


आपल्या मोबाईल मधिल play store मध्ये जा.




play store मध्ये टाईप करा.

E-Peek Pahani

किंवा खालील लिंकवर क्लिक करा.




[E-Peek Pahani Apps on Google Play]

महाराष्ट्र शासन

# मोबाईल ॲप वापरण्यासाठीची आणि नोंदणी करण्यासाठीची माहिती

ई-पीक पाहणी

ई-पीक पाहणी



## आपले मन:पूर्वक स्वागत

महाराष्ट्र शासन
महसूल विभाग

"माझी शेती, माझा सातबारा,
मीच नोंदविणार माझा पीक पेरा "

------------------------

जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख , म.राज्य , पुणे

ई पीक पाहणी हेल्पलाईन क्र ०२०२५७१२७१२

ई-पीक पाहणी



## ॲप वापरण्यासाठी आवश्यकता

| | |
|---|---|
| **अद्यावत प्रणाली :** | अँड्रॉईड 4.4(KitKat) किंवा त्यावरील |
| **इंटरनेट :** | 3G, 4G किंवा वायफाय (WiFi) |
| **मेमरी :** | कमीतकमी 2GB रॅम |
| **कीबोर्ड :** | गुगल इंडीक कीबोर्ड (मराठी टायपिंगसाठी) |

ई पीक पाहणी हेल्पलाईन क्र ०२०२५७१२७१२

## नोंदणी करण्यासाठी खालील बाबींची मदत होऊ शकेल.

१. अद्यावत गा. नं. ७/१२ आणि ८ अची प्रत.

२. जमीन मालक आपली नोंदणी करतील.

३. सामायिक मालकीच्या जमिनीसाठी, ज्याचे नाव गां.न.नं. ७/१२ मध्ये सामायिक खातेदार म्हणून नोंदले आहे,ते स्वतंत्रपणे नोंदणी करू शकतील.

**नोंदणी झाल्यानंतर प्रत्यक्ष शेतामध्ये पीक पाहणी करताना मोबाइल मध्ये लोकेशन सेटिंग खालील प्रमाणे करावे.**

अ. लोकेशन ह्या आयकॉन वर दोनदा क्लिक करून लोकेशन प्रकार (Method) ही "फोन फक्त" (Phone only) ह्या प्रमाणे सेट करावे.

ब. त्याच प्रमाणे Emergency Location Service ला बंद ठेवावे.

किंवा

क. अक्षांश रेखांश अचूकता मिळणे साठी आपला मोबाईल Flight mode वर ठेवावा.पीक पहाणी पुर्ण झाल्या नंतर माहिती सर्वर वर अपलोड करणे साठी पुन: wifi / इंटरनेट सुरू करावा व नंतर माहिती अपलोड करावी.

**महसूल विभाग**

नाशिक


ई पीक पाहणी हेल्पलाईन क्र ०२०२५७१२७१२

**त्यामधील सूचनेप्रमाणे डावीकडे सरकवा,डावीकडे सरकवा व आपला नाशिक विभाग निवडुन पुढे जा**

महाराष्ट्र शासन


# मोबाईल नंबर भरण्याची सुविधा

ई-पीक पाहणी




❖मोबाईल क्रमांक अचुक टाकावा.

❖एका नोंदणीकृत मोबाईल मधुन जास्तीत जास्त १०० खातेदार यांची पीकपाहणी नोंदवता येते.



महाराष्ट्र शासन

# जिल्हा, तालुका आणि गाव निवडणे

ई-पीक पाहणी







- आपल्याला ज्या गावात पिकपाहणी करावयाची आहे.तो जिल्हा,तालुका,व गाव निवडा.

महाराष्ट्र शासन

# खातेदाराचे नाव शोधणे आणि निवडणे

ई-पीक पाहणी




❖ई पिकपाहणी अप मध्ये शेतकरी त्यांचे सोबत दाखवल्याप्रमाणे पहिले नाव ,मधले नाव,आडनाव यावरून खाते शोधू शकता.किंवा खाते क्रमांक,गट क्रमांक यावरून खातेदाराचे नाव शोधता येईल.

❖ज्या खातेदाराचे त्या गावात एकापेक्षा जास्त खाते आहेत.त्यांनी नाव नमुद केल्यास त्या सर्व खात्यावरील स.न.पीकनोंदणीसाठी उपलब्ध दिसतील.

महाराष्ट्र शासन


# खातेदाराचे नाव शोधणे आणि निवडणे

ई-पीक पाहणी










**याठिकाणी पहिले नाव नमूद करून खातेदार शोध घेतला आहे.खातेदार नाव शोधल्यावर पुढे क्लिक करा.**

महाराष्ट्र शासन

# खातेक्रमांक व मोबाईल क्रमांक तपासुन घेणे.

ई-पीक पाहणी




❖याठिकाणी मोबाईल क्रमांक बदल करावयाचा असेल तर बदल करता येईल.तोच मोबाईल क्रमांक ठेवायचा असेल तर पुढे जा वर क्लिक करा.



महाराष्ट्र शासन

# चार अंकी सांकेतांक (OTP) भरणे

ई-पीक पाहणी




❖आपल्या मोबाईल वर चार अंकी सांकेतांक SMS येईल.




❖सांकेतांक कायम स्वरूपी असेल.



महाराष्ट्र शासन

# होम स्क्रीन (मुख्य पान)

ई-पीक पाहणी




A. कायम पड/चालू पड नोंदवा

B. पीक माहिती नोंदवा

C. बांधावरची झाडे नोंदवा

D. अपलोड

E. पीक माहिती मिळवा

F. गावाचे खातेदारांची पिकपाहणी

महाराष्ट्र शासन

# A.कायम पड/चालू पड नोंदवा

ई-पीक पाहणी




खडकाळ,माळरान जमीन कायम पडीत जमिनीची माहिती भरता येते.

उदा-वस्तीपड,विहीर पड


❖चालु हंगाम पडीत जमिनीची माहिती भरता येते.

उदा-गवतपड,चराई पड



महाराष्ट्र शासन

ई-पीक पाहणी











❖फोटो काढून स्वयंप्रमाणीत केलेली माहिती पड माहिती पहा मध्ये दिसेल.
४८ तासाच्या आत ती दुरुस्ती किंवा नष्ट करता येईल.

महाराष्ट्र शासन

# B. पिकाची माहिती नोंदवा

पीक माहिती नोंदवा

ई-पीक पाहणी




यामध्ये दोन पर्याय दिसतील. १)पिकपेरणी माहिती भरा. २)पिकांची माहिती आपल्याला पिकपेरणीची माहिती भरावयाची आहे.

१.खाते क्रमांक
२.भूमापन क्रमांक /स.न
३.जमिनीचे एकूण क्षेत्र (हे.आर)
४.पोटखराबा
५.हंगाम
६.पिकपेरणी साठी उपलब्ध क्षेत्र
७.पिकांचा वर्ग
८.पिकपेरणी केलेले क्षेत्र
९.जलसिंचन साधन
१०.सिंचन पद्धत
११.लागवडीचा दिनांक
१२.अक्षांश रेखांश मिळवा.
१३.पेरणी पिकांचा फोटो काढणे


महाराष्ट्र शासन

# खाते क्रमांक,स.न क्रमांक,एकुण क्षेत्र,पोटखराबा क्षेत्र भरणे

पीक माहिती नोंदवा

ई-पीक पाहणी




१.खाते क्रमांक निवडणे (ई पिकपाहणी मध्ये पिकपाहणी खातेनिहाय होणार आहे.)

२.खात्यामधील भूमापन क्रमांक /स.न पाहणे.ज्या स.न ची पिकपाहणी करावयाची आहे.तो स.न निवडणे.


३.स.न मधील जमिनीचे एकुण क्षेत्र (आपोआप AUTO येते.

४.त्या स.न चे पोटखराबा क्षेत्र आपोआप AUTO येते.

महाराष्ट्र शासन

पीक माहिती नोंदवा

ई-पीक पाहणी




## ५.हंगाम

- ❖खरीप हंगाम-(जुन ते सप्टेंबर)
- ❖रब्बी हंगाम-(ऑक्टोबर ते जानेवारी)
- ❖उन्हाळी हंगाम-(फेब्रुवारी ते मे)
- ❖संपूर्ण वर्ष-पीक वार्षिक अथवा बहुवार्षिक असल्यास

➢ज्या कालावधीत पीक घेतले आहे.तो वर्षातील विशिष्ट हंगाम म्हणुन निवडा.

## ६.पीक पेरणीसाठी उपलब्ध क्षेत्र

➢सदर स.न क्षेत्र हे AUTO दिसेल.जसजसे शेतकरी पीकपाहणी सबमिट करत जातील तसे स.न चे क्षेत्र कमी कमी होत जाईल.यामुळे वाढीव क्षेत्राचा पीकपेरा भरला जाणार नाही.

महाराष्ट्र शासन

पीक माहिती नोंदवा

ई-पीक पाहणी

## ७.पिकांचा वर्ग




१.निर्भेळ पीक
२.मिश्र पीक
३.पॉलिहाऊस पीक
४.शेडनेटहाऊस पीक

**निर्भेळ पीक**-एका क्षेत्रावर एका वेळी एकच पीक घेतली असल्यास त्याला निर्भेळ पीक म्हणतात.

**मिश्र पीक व घटक पीक**-एकाच क्षेत्रावर एकाच वेळी एका पेक्षा जास्त पिके घेतली असल्यास त्याला मिश्र पीक म्हणतात.व त्यातील प्रत्येक पिकाला घटक पीक म्हणतात.

महाराष्ट्र शासन

# निर्भेळ पीक नोंदणी

पीक माहिती नोंदवा

ई-पीक पाहणी




पिकाचा वर्ग निर्भेळ पीक निवडा केल्यावर पिकाचा प्रकार पीक व फळपिक हे दोन पर्याय दिसतील.अशा वेळी योग्य तो पर्याय निवडा करावे.

पीक हा पर्याय-निवड करून शेतातील घेतलेल्या पिकाचे नाव निवडुन क्षेत्राची नोंद करावी. नाव शोधण्यासाठी टाईप केले तरी चालेल.

फळबाग हा पर्याय-शेतामध्ये आंबा व इतर फळपीक असल्यास ते निवड करून झाडांची संख्या व क्षेत्र नमूद करावे.

महाराष्ट्र शासन

# मिश्र पीक व घटक पीक

पीक माहिती नोंदवा

ई-पीक पाहणी



❖मिश्र पिक म्हणजे थोडक्यात आंतरपीक

❖आपण ऊस पिकामद्ये कोबी,झेंडु यासारखी आंतरपिके घेतो.किंवा आवळा पिकामद्ये पालेभाज्या,किंवा चारा पीक घेतो.

❖मिश्र पिकांची पीकपाहणी नोंद करताना मुख्य पीक व घटक पिके यांची बेरीज एकुण पेरणी क्षेत्राएवढी असावी. समजा ०.२० हे.आर मध्ये ऊस पिकात कोबी आंतरपीक आहे.ऊस व कोबी सरी मोजुन मुख्य व घटक पीक यांचे क्षेत्र भरावे.कोबी=०.१५ हे.आर ऊस=०.०५

महाराष्ट्र शासन

# मिश्र पीक व घटक पीक नोंदणी

पीक माहिती नोंदवा

ई-पीक पाहणी










एक मुख्य पिक व तीन दुय्यम पिके यांची माहिती भरता येईल.दुय्यम पीक हंगाम ,क्षेत्र,लागवडीचा दिनांक नोंदविता येईल.

महाराष्ट्र शासन

पीक माहिती नोंदवा

ई-पीक पाहणी

# पॉलीहाऊस पीक व शेडनेट पीक



❖पॉलीहाऊस पीक-

❖पॉलीथिलीन पासुन बनवलेले संरक्षणात्मक छायाघर त्यामध्ये बसविलेल्या उपकरणाच्या मदतीने तापमान,आर्द्रता,प्रकाश नियंत्रित केला जातो.अर्धवर्तुळाकार किंवा चौरस कृती आकार असतो.



❖शेडनेट पीक-

❖तापमान,आर्द्रता,कार्बन काही प्रमानात नियंत्रित ठेवण्यासाठी उभारलेला मांडव.बांबू,वासे वापरून ऊन,वारा,पाऊस पासुन पिकांचे संरक्षण करण्यासाठी उभारणी केली जाते.

महाराष्ट्र शासन

# पॉलीहाऊस पीक व शेडनेट पीक नोंदणी

पीक माहिती नोंदवा

ई-पीक पाहणी









महाराष्ट्र शासन

# पीक पेरणी केलेले क्षेत्र नोंद करणे

पीक माहिती नोंदवा

ई-पीक पाहणी



पिकाचा वर्ग *

निर्भेळ पिक - (एक पीक)

निर्भेळ पिकाचा प्रकार

पीक

पिकांची / झाडांची नावे *

बाजरी (धान्यासाठी)

क्षेत्र भरा (हे. आर) *

जल सिंचनाचे साधने *

निवडा

सिंचन पद्धती *

निवडा

लागवडीचा दिनांक *

किमान आधारभूत किंमत योजने अंतर्गत विक्री साठी नोंदणी करावयाची आहे काय ?

होम

अभिप्राय नोंदवा

मदत

## ८.पीक पेरणी क्षेत्र-

❖आपल्या शेतातील आपण निवड केलेल्या पिकाचे किती क्षेत्र आहे ते नमुद करावे.

❖क्षेत्र भरताना हे.आर स्वरुपात भरावे.

जसे २० गुंठे= ०.२०००

४० गुंठे=०.४०००

महाराष्ट्र शासन

# जलसिंचन साधन

पीक माहिती नोंदवा

ई-पीक पाहणी

## ९.जलसिंचन साधन-





❖**जलसिंचित पिके** -जी पिके बाह्य पाण्याचा पुरवठा करून घेतली जातात.अश्या पिकांना बागायत पिके किंवा जलसिंचित पिके म्हणतात.उदा-ऊस

❖**अजलसिंचित पिके** -जी पिके पावसाच्या पाण्यावर घेतली जातात त्यांना जिरायत पिके किंवा अजलसिंचित पिके म्हणतात. उदा-भात

महाराष्ट्र शासन

# सिंचन पद्धती

पीक माहिती नोंदवा

ई-पीक पाहणी





## १०.सिंचन पद्धती

❖जलसिंचन पद्धती मध्ये प्रकार निवडल्यावर ठिबक ,तुषार,प्रवाही व अन्य प्रकारे सिंचन हे पर्याय दिसतील. आपल्या पिकाला पाणी देण्याच्या पद्धतीनुसार एक पद्धत निवडावी.

❖अजलसिंचित मध्ये वरील पर्याय दिसणार नाहीत.

महाराष्ट्र शासन

पीक माहिती नोंदवा

ई-पीक पाहणी

# ९.जलसिंचन साधन

# १०.सिंचन पद्धत







महाराष्ट्र शासन

# पीक लागवडीचा दिनांक

पीक माहिती नोंदवा

ई-पीक पाहणी




## ११.लागवडीचा दिनांक-

**शेतकरी यांनी पीक पेरणी केलेला दिनांक नमुद करावा.**



महाराष्ट्र शासन

ई-पीक पाहणी

# किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत पिकाच्या विक्रीसाठी नोंदणी




**किमान आधारभूत योजनेंतर्गत येणाऱ्या पिकांची ई-पीक पाहणी साठी शेतकरी यांनी नोंदणी केल्यास त्यामध्ये अशा शेतकरी यांची माहिती वेब प्रणालीद्वारे पुरवठा विभागाला जाईल.नोंदणी झाल्यास शेतकरी यांना खरेदी केंद्रामाद्ये जावून रांगेत उभे राहून नोंदणी करण्याची आवश्यकता भासणार नाही.**

महाराष्ट्र शासन

# १२.अक्षांश व रेखांश मिळवा.

पीक माहिती नोंदवा

ई-पीक पाहणी




❖प्रत्येक गटाच्या मध्यबिंदुपासुन अंतर सामाविष्ट केल्याने पिकाचा फोटो घेताना त्या पासूनचे अंतर दिसणर आहे.गटापासून दूर गेल्यास संदेश येणार आहे.यामुळे अचूक फोटो घेतला किंवा नाही निर्धारित होईल.

❖अक्षांश रेखांश अचूक मिळण्यासाठी आपला मोबाईल Flight Mode वर ठेवावा.पीकपाहणी पूर्ण झाल्यावर नंतर माहिती सर्वरवर अपलोड करण्यासाठी इंटरनेट सुरु करावे.व माहिती अपलोड करावी.

महाराष्ट्र शासन

# १३.मुख्य पिकाचे छायाचित्र

पीक पेरणीचा तपशील

ई-पीक पाहणी




❖योग्य अक्षांश रेखांश आल्यास शेतकरी या ठिकाणी पीक पेरणी केलेल्या पिकांचा फोटो अपलोड करतील.

❖मोबाईल मधिल अगोदर काढलेला फोटो अपलोड करता येणार नाही.Geo fencing सुविधा असल्याने प्रत्यक्ष शेतात जाऊन फोटो काढणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन

# पीकपाहणी शेतकरी द्वारे स्वयंप्रमाणित

ई-पीक पाहणी




❖पिकाचा फोटो घेऊन नोंदविलेल्या पिकाबाबत स्वयंघोषणापत्र शेतकरी यांचेकडून घेतले जाईल.शेतकरी यांनी केलेली पिकपाहणी स्वयंप्रमाणित मानण्यात येऊन ती सातबारावर प्रतिबिंबित होईल.

❖नोंदविलेली पिकपाहणी स्वयंप्रमाणित करून पुढे जा वर क्लिक करा.

महाराष्ट्र शासन

# शेतकरी यांना पीकपाहणी दुरुस्ती सुविधा

ई-पीक पाहणी




❖पीक माहिती नोंदवा मधिल पिकांची माहिती पहा मध्ये नोंदविलेली पिकाची माहिती दिसेल.

❖ शेतकरी यांनी नोंदविलेली पीकपाहणी नोंदविल्यापासून ४८ तासामध्ये स्वत:हून केव्हाही एक वेळेस दुरुस्त करता येईल.किंवा नष्ट करता येईल.

महाराष्ट्र शासन

ई-पीक पाहणी

# C.बांधावरील झाडे नोंदवा.







❖मुख्य होम पेज वरून बांधावरील झाडांची नोंद करता येईल.झाडांची संख्या लिहणे आवश्यक आहे.झाडांचा फोटो काढून सबमिट करावा.

❖बांधावरील झाडांची माहिती पहा मध्ये नोंदविलेली झाडांची माहिती दिसेल.

महाराष्ट्र शासन

# E.अपलोड

ई-पीक पाहणी







❖ ज्या भागात मोबाईल नेटवर्क नाही.त्या ठिकाणी नोंदविलेली पीकपेरणीची सबमिट केलेली माहिती अपलोड करता येईल.

❖ अचुक अक्षांश रेखांश साठी मोबाईल Flight Mode वर ठेवून नोंदविलेली पिकपाहणी अपलोड करता येईल.


महाराष्ट्र शासन

# F.पीक माहिती मिळवा.

ई-पीक पाहणी




❖आपण नोंदविलेली पिकाची माहिती याठिकाणी पाहता येईल.



महाराष्ट्र शासन

# संपुर्ण गावाची पिकपाहणी पाहण्याची सुविधा

ई-पीक पाहणी




❖गावातील खातेदारांनी नोंदविलेल्या पीकपाहणीची माहिती पाहण्यासाठी सुविधा आहे.त्याद्वारे शेतकरी यांना पीकपाहणी मध्ये दुरुस्ती करावयाची असल्यास माहिती मिळेल.

❖गावातील खातेदारांनी नोंदविलेली पीकपाहणी माहिती तसेच गावातील पिकांची महिती पाहता येईल.

महाराष्ट्र शासन

# खाता अपडेट करण्याची सुविधा

ई-पीक पाहणी




❖पिकपाहणी हंगाम सुरु असताना खात्यामध्ये फेरफार नोंदीमुळे काही बदल झाल्यास खाताअपडेट मधून ईफेरफार प्रणालीतील अद्ययावत खाता माहिती मिळवता येईल.


❖क्षेत्रात बदल,हस्तांतरण मुळे झालेला बदल अपडेट करता येईल.

❖एखादा खातेनंबर निवडा करूनही गट/स.न/क्षेत्र दिसत नसल्यास खाताअपडेट मध्ये तो खातेनंबर अपडेट करावा.

महाराष्ट्र शासन

# ॲप बाबत अभिप्राय व रेटिंग नोंदविणे

ई-पीक पाहणी




❖ई-पीकपाहणी ॲप वापरणाऱ्या वापरकर्ते यांना ॲप बाबत अभिप्राय नोंदविण्याची सुविधा देण्यात आलेली आहे.

❖ॲप वापरताना येणाऱ्या अडचणी तसेच ई पीकपाहणी बाबत आपले मत नोंदविता येईल.ॲप साठी रेटिंग देता येईल.

महाराष्ट्र शासन

# एकापेक्षा अधिक खातेदार नोंदणी करणे

ई-पीक पाहणी




❖एका नोंदणीकृत मोबाईल मधुन जास्तीत जास्त १०० खातेदार नोंदणी करता येते.व त्या खातेदार यांची पीकपाहणी करता येते.

❖सदर अप चालु केल्यानंतर नविन खातेदार नोंदणी करा याचा वापर नविन खातेदार नोंदणी करता येते.

महाराष्ट्र शासन

# ॲप अपडेट सुविधा बाबत

ई-पीक पाहणी




❖ॲप वापरकर्ते यांच्या मागणीनुसार त्यामध्ये बदल करण्यात येतो. ॲप बाबत अभिप्राय व ॲप अधिकाधिक सुलभ करण्यासाठी नवीन बदल करणे आवश्यक असते.

❖ आपल्या मोबाईल मधिल जुने ॲप अपडेट करण्यासाठी सुविधा देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन

# ॲप वापरताना अडचणी बाबत मदत

ई-पीक पाहणी







❖ॲप वापरताना वापरकर्ते यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी ॲप मध्ये होम स्क्रिन व मुख्य पटलावर **"मदत"** हे बटन देण्यात आलेले आहे.त्यामधील लिंक वापर करून अडचणी सोडवता येतील.

महाराष्ट्र शासन

ई-पीक पाहणी

## माझी शेती माझा सातबारा .....
## मीच नोंदविणार माझा पीकपेरा ..

# धन्यवाद

अधिक माहितीसाठी

तलाठी कार्यालय व मंडळअधिकारी कार्यालय संपर्क साधा.



राज्य मदत कक्ष- 020 25712712